## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८

### अ प्रभाग समिती

### सभावृत्तांत [कार्यपत्रिका क्रमांक ०9]

**दिनांक : 14/01/2020** **वेळ : सकाळी 11.30 वा.**

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे जानेवारी **2020 ची** मासिक सभा मंगळवार दिनांक **14/01/2020** रोजी सकाळी **11.30 वा.** अ क्षेत्रीय कार्यालयातील **" राजमाता जिजाऊ सभागृह"** येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा.शर्मिला राजू बाबर | सभापती |
| 2. | मा. अनुराधा गणपत गोरखे | सदस्या |
| 3. | मा.केशव हनुमंत घोळवे | सदस्य |
| 4. | मा.तुषार रघुनाथ हिंगे | सदस्य |
| 5. | मा.जावेद रमजान शेख | सदस्य |
| 6. | मा.मिनल विशाल यादव | सदस्या |
| 7. | मा.शैलजा अविनाश मोरे | सदस्या |
| 8. | मा.अमित राजेंद्र गावडे | सदस्य |
| 9. | मा.राजेश पोपट सावंत | स्वीकृत सदस्य |
| 10. | मा.कदम सुनिल मानसिंग | स्वीकृत सदस्य |
| 11. | मा. कांबळे राजेंद्र नामदेव | स्वीकृत सदस्य |

याशिवाय मा.श्रीमती आशादेवी दुरगुडे- क्षेत्रिय अधिकारी, मा.श्री. रविंद्र पवार-कार्यकारी अभियंता(स्थापत्य), मा.श्री. संजय खाबडे-कार्यकारी अभियंता (विद्युत), मा.श्री दशरथ कांबळे-प्रशासन अधिकारी, मा.श्री मोहन निकम-लेखाधिकारी, मा.श्री महादेव शिंदे, सहाय्यक आरोग्याधिकारी, मा.श्री शिवाजी चौरे-उपअभियंता(स्थापत्य),मा.श्री सुर्यकांत मोहिते-उपअभियंता(स्थापत्य) मा.सौ. लता बाबर-उपअभियंता(विद्युत), मा.श्री नरोटे सुनिलदत्त्-उपअभियंता(स्थापत्य् उदयान) मा.श्रीमती मोमीन झेड.आय.-उपअभियंता(झोनिपु स्थापत्य),मा.श्री मोहन इश्वरा खोंद्रे-उपअभियंता(झोनिपु स्थापत्य), मा. श्री. एस.पी.काळे-उपअभियंता(ड्रेनेज),मा.श्रीडी.एम.कुंभार-उपअभियंता(पाणीपुरवठा) मा.श्री साळवी प्रकाश-उपअभियंता(नगररचना) मा.श्री पी.एम.गायकवाड-उद्यान अधिक्षक, श्री हरिदास एस.जे.-कनिष्ठ अभियंता-झोनिपु स्थापत्य, श्री शेख-कनिष्ठ् अभियंता (झोनिपु), श्री संदिप वैद्य-कनिष्ठ् अभियंता, श्रीमती साळुंके अस्मिता-कनिष्ठ अभियंता-स्थापत्य् उद्यान, श्री कोटियाना डी.एम.-आरोग्य् निरिक्षक, श्री पगार एस.जी.-जनरेटर ऑपरेटर, श्रीमती नंदिनी सुर्यवंशी-मुख्य् लिपिक(भूमि जिंदगी), इ.अधिकारी/ कर्मचारी बैठकीस उपस्थित होते.

सर्वप्रथम मा. सभापती, शर्मिला राजू बाबर यांनी सर्व उपस्थित पदाधिकारी, सन्मा. नगरसदस्य, अधिकारी यांचे स्वागत करुन सभेची सुरुवात करणेस अनुमती दिली.

सभेचे सुरुवातीस अ क्षेत्रिय कार्यालयातील माजी प्र.प्रशासन अधिकारी कै.अनिल वसंत थेऊरकर यांचे निधन झाल्याने तसेच सन्मा.सदस्या वैशाली काळभोर यांच्या सासूबाई कै.यमुना ज्ञानेश्वर् काळभोर यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध् उभे राहून श्रध्दांजली अर्पण करणेत आली.

यानंतर बैठकीचे कामकाज सुरु करणेत आले.

त्यानंतर प्रस्तुत सभेमध्ये खालील विषय ऐनवेळचे विषय म्हणून दाखल करुन घेण्यात आले.

**विषय क्रमांक ४:-** सन्मा.सदस्य् केशव हनुमंत घोळवे यांचा दिनांक १४/१/२०२० रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १० मधील नागरी समस्या व विषय अ प्रभाग मासिक बैठकीमध्ये मंजूर करणेबाबत.

**विषय क्रमांक ५:-** सन्मा.सदस्य् केशव हनुमंत घोळवे यांचा दिनांक ०४/०१/२०२० रोजीचा प्रस्ताव.

एम्पायर स्क्वेअर या सोसायटीकडे येणा-या बाह्य मार्गावर दिशादर्शक नामफलक बसविणेबाबत.

**कार्यपत्रिका क्रमांक ०८ दिनांक १०/१२/२०१९ रोजी स.११.३० वा.झालेल्या अ प्रभाग समिती सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत असलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.**

---

**सभेत खालीलप्रमाणे ठराव मंजूर करणेत आले.**

ठराव क्रमांक 22 — विषय क्रमांक 1

दिनांक- 14/1/2020 — विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव

सुचक: : मा.अनुराधा गोरखे — अनुमोदक: मा.शर्मिला बाबर

संदर्भ: मा.उपमहापौर यांचेकडील पत्र क्र.उपमहापौर/कावि/७८६/२०१९ दि.२८/११/२०१९ रोजीचे पत्र.

पिंपरी चिंचवड शहरातील सर्व्हे नं.३०१ बर्डव्हॅली मधील HDFC कॉलनी शेजारील गाळे सद्यस्थितीत रिकामे आहेत. प्रभागातील खालील स्थानिक नागरिकांना सदरचे गाळे ११ महिन्याच्या मुदतीवर भाडे तत्वावर चालविणेस देणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. ठराव कायम होणेची वाट न पाहता ठरावाची अंमलबजावणी करणेत यावी.

१.संदिप बाबुराव मोरे-विद्यानगर
२. संभाजी बळीराम नाईकनवरे- विद्यानगर
३.राम वसंत बसवणे-विद्यानगर
४. निलेश विनायक भिगवणकर-विद्यानगर
५.शबाना खदीर शेख-विद्यानगर
६. सोमनाथ अशोक मोहिते-विद्यानगर
७.गंगा रामराज भेंडेकर-दत्तनगर
८. बाळू विष्णू लोंढे-दत्तनगर
९.धरम भिमाशंकर वाघमारे-दत्तनगर
१०. मोहमंद सुलेमान घाची-आण्णासाहेब मगर
११.अमोल कुचेकर-दत्तनगर
१२. प्रविण शिंदे-शाहूनगर
१३.किरण वेताळकर-दत्तनगर
१४. नितीन दातीर-विद्यानगर
१५आशा गायकवाड-संभाजीनगर
१६ नरेंद्र राजपूत-संभाजीनगर
१७.इरफान सुलेमान शेख-विद्यानगर

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 23 — विषय क्रमांक 2

दिनांक 14/01/2020 — विभाग : सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव

सुचक: मा. अनुराधा गोरखे — अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ:- सन्मा. सदस्या अनुराधा गणपत गोरखे यांचा दिनांक २८/११/२०१९ रोजीचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड शहरातील सर्व्हे नं.३०१ बर्डव्हॅली मधील HDFC कॉलनी शेजारील गाळे सद्यस्थितीत रिकामे आहेत. प्रभागातील खालील स्थानिक नागरिकांना सदरचे गाळे ११ महिन्याच्या मुदतीवर भाडे तत्वावर चालविणेस देणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. ठराव कायम होणेची वाट न पाहता ठरावाची अंमलबजावणी करणेत यावी.

१. अमोल कुचेकर-दत्तनगर
२. प्रवीण शिंदे- शाहूनगर
३. किरण वेताळकर-दत्तनगर
४. नितीन दातीर- विद्यानगर
५. आशा गायकवाड-संभाजीनगर
६. नरेंद्र राजपूत- संभाजीनगर
७. इरफान सुलेमान शेख-विद्यानगर

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 24
दिनांक 14/01/2020
सुचक: मा. अनुराधा गोरखे

विषय क्रमांक 3
विभाग : सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ:- सन्मा. सदस्य् जावेद शेख यांचा दिनांक १/१/२०२० रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १४ दत्तवाडी, उत्कृर्ष क्लास जवळील व माताजी सुपर मार्केट समोरील FRP वाचनालय काढून टाकणेस मान्यता देणेत येत आहे. ठराव कायम होणेची वाट न पाहता ठरावाची अंमलबजावणी करणेत यावी.

आकुर्डी निगडी रस्त्यावरील "संततुकाराम व्यापारी संकुल" शेजारी असलेले FRP वाचनालय काढून टाकणेस मान्यता देणेत येत आहे. ठराव कायम होणेची वाट न पाहता ठरावाची अंमलबजावणी करणेत यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 25
दिनांक 14/01/2020
सुचक: मा. अनुराधा गोरखे

विषय क्रमांक 4
विभाग : सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. मिनल यादव

संदर्भ:- सन्मा. सदस्य् केशव हनुमंत घोळवे यांचा दिनांक १४/१/२०२० रोजीचा प्रस्ताव.
प्रभाग क्रमांक १० मधील नागरी समस्यांबाबत खालीलप्रमाणे विषय मंजूर करणेस मान्यता देणेत येत आहे.
१.प्रभाग क्रमांक १० शाहूनगर येथील एच.डी.एफ.सी.कॉलनी ते आदर्श ट्रेडिंग समोरील रोडवरील अवजड वाहनांना नो पार्किंग करण्यात यावे जेणेकरुन नागरिकांना होणारा त्रास थांबू शकेल.
२.संभाजीनगर काका हलवाई स्वीट येथील लिंक रोडवर सिध्दीविनायक मंदिर येथे स्पीड ब्रेकर्स बसवावेत.
३.संभाजीनगर येथे गिरी विहार सोसायटी ते तुळजाभवानी मंदिर चौक या रोडवर आवश्यक तेथे स्पीड ब्रेकर्स बसवावेत.
४.प्रभाग क्र.१० मधील स्वीमींग पुल समोरील रस्त्याच्या कडेला पादचा-यांसाठी नवीन पदपथ तयार करावेत जेणेकरुन त्यांची गैरसोय दूर होईल.
५. शाहूनगर संभाजीनगर येथील स्ट्रीट लाईट्स झाडांच्या फांद्यामुळे झाकून गेलेल्या आहेत त्यामुळे रस्त्यावर अंधार असतो व अपघात होतात. तरी अशा सर्व झाडांच्या फांद्यांची छाटणी करावी व भरपूर उजेड राहिल अशी परिस्थिती निर्माण करावी.
६. शाहूनगर येथील जेष्ठ नागरिक विरंगुळा केंद्रामध्ये नामवंत कंपनीचा व योग्य क्षमतेचा इन्व्हर्टर बसविणे.
७. शाहूनगर येथील क्रिडांगणामधील व्यासपीठाचे व प्रेक्षक गॅलरीचे दुरुस्तीकरण व सुशोभिकरण करणे.
८. शाहूनगर येथील धर्मवीर संभाजी महाराज चौकाचे सुशोभिकरण करणे.
९. शिवशंभो फाऊंडेशन वाचनालय व धर्मवीर संभाजी राजे मंच वाचनालयाचे अद्ययावावत सुशोभिकरण करणे.
१०.शाहूनगर येथील क्रिडांगणाचे नूतनीकरण करणे. खेळाचे मैदानात स्प्रींकलर्सची व्यवस्था करणे.
११.शिव शंभू चौक येथील डिव्हायडर्स तुटलेले असून नव्याने बसविणे व दिशादर्शक ॲरोज रेडियम द्वारे बसविणे.
१२. शाहूनगर येथील महालक्ष्मी मंदिरसमोरील रस्त्याचे कडेचे पदपथ नव्याने करण्यात यावे.
१३. शाहूनगर संभाजीनगर येथील सर्व पदपथांची पाहणी करुन खचलेले पेव्हींग ब्लॉक्स व खराब झालेल्या पदपथांची दुरुस्ती करणे.
१४. प्रभाग क्रमांक १० मधील एच.डी.एफ.सी. कॉलनी समोरील रोडवर शाहूनगरकडे जाणा-या मार्गावर सिग्नल बसविणे. जेणेकरुन अपघात होणार नाही.
१५. शाहूनगर,संभाजीनगर,विद्यानगर येथील अनावश्यक बसथांबे की, ज्यांचा वापर होत नाही, त्या ठिकाणी एकही बस येत नाही ते काढून टाकून मनपा परिसरातील इतरत्र आवश्यक त्या ठिकाणी बसविणे.
१६. प्र.क्र.१० मधील मुख्य चौक ,अंतर्गत चौक व रस्त्यांवर सी.सी.टी.व्ही.कॅमेरे बसविणे.
ठराव कायम होणेची वाट न पाहता ठरावाची अंमलबजावणी करणेत यावी.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 26
दिनांक 14/01/2020
सुचक: मा. अनुराधा गोरखे

विषय क्रमांक ५
विभाग : सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. मिनल यादव

संदर्भ:- सन्मा. सदस्य् केशव हनुमंत घोळवे यांचा दिनांक ४/१/२०२० रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १० मधील एम्पायर स्क्वेअर ही सोसायटी ऍटो क्लस्टर शेजारी नव्याने विकसित झालेली असून तेथे नागरिक,माता,बंधू,भगिनी वास्तव्यास आले असून त्यांना व त्यांचे नातेवाईकांना ये-जा करताना दिशादर्शक नामफलक नसल्यामुळे तसेच नवीन सोसायटी असल्यामुळे आवश्यक व लगतचा मार्ग सापडत नसल्यामुळे मानसिक/आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. एम्पायर प्रॉपर्टीज यांनी दि.२.१.२०२० रोजी सन्मा.नगरसदस्य श्री केशव घोळवे यांचेकडे दिलेल्या गुगल मॅपमध्ये मार्किंग केलेल्या सर्व ठिकाणी लवकरात लवकर दिशादर्शक नामफलक बसविणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

<u>ठराव सर्वानुमते मंजुर झाला.</u>

वरील प्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. सभापती- शर्मिला राजू बाबर, अ प्रभाग समिती यांनी सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, पदाधिकारी/अधिकारी यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

[ शर्मिला राजू बाबर ]
सभापती
अ प्रभाग समिती
निगडी- 44

क्रमांक:- अक्षेकां/9/कावि/16 /2020 दिनांक:-20/01/2020

(दशरथ कांबळे)
प्रशासन अधिकारी
तथा सचिव, सभा शाखा
अ प्रभाग समिती, निगडी-44

प्रति,
सर्व संबंधित ---------------------